| | | |
|---|---|---|
| | **जनसंपर्क अधिकारी**<br>पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार<br>यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व,<br>जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१<br>E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in | |


प्रेस नोट :- ४३५/२०२३ दिनांक – २२/१२/२०२३

# नागरीकांना फसवुन त्यांना ब्लॅकमेंलीग करुन खंडणी उकळणाऱ्या आंतराज्यीय टोळीला अटक करण्यात वालीव पोलीस ठाण्यास यश

यातील फिर्यादी हे बांधकाम व्यवसायीक असुन यातील महीला आरोपी ही फिर्यादी यांच्या मालकीच्या वसई पुर्व येथील रुममध्ये भाडेत्तत्वावर राहत असताना एक महिला आरोपी व दोन पुरुष आरोपी यांनी कट रचुन व आपसात संगनमत करुन सन २०२२ मध्ये फिर्यादी यांना महीला आरोपीने तिचे रूममध्ये बोलावुन पुर्वनियोजीत ठरल्याप्रमाणे आरोपी नामे १) मनिष शेठ व २) नफिस शेख यांनी फिर्यादींना " महीला आरोपी ही प्रेग्नंट आहे, तु तिचेवर रेप केला " अशी तक्रार पोलीसात दाखल करीन अशी धमकी देऊन फिर्यादी यांना शिवीगाळी दमदाटी करुन व ठोश्याबुक्याने मारहाण केली व पोलीस ठाण्यात रेप केस न दाखल करण्याच्या मोबदल्यात फिर्यादी यांना ब्लॅकमेलिंग करुन फिर्यादी यांचेकडून २ करोड रुपये खंडणी मागुन वेळोवेळी फिर्यादीकडुन एकुण १९ लाख ७० हजार रुपये खंडणी स्विकारली. तसेच आरोपीत नामे नफीज शेख यांने फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन त्यांना गुंदवली, अंधेरी पुर्व, मुंबई येथे असलेली स्थावर मालमत्ता स्वस्थ दरात मिळवुन देतो असे सांगुन फिर्यादी याचेकडुन रु. २४,००,०००/- रक्कम स्विकारुन अपहार केला. तसेच फिर्यादीच्या वसई पुर्व येथे असलेली बिल्डींग ही रेल्वे कॉरीडॉरमध्ये कटींग होणार असल्याचा खोटा नकाशा फिर्यादी यांना दाखवुन भरपाईपोटी संबंधीत प्राधिकरणाकडुन रु. २५ करोड रक्कम वसुल करुन देतो असे खोटे आश्वासन दिले. त्याकरीता रेल्वेच्या व इतर विभागांच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांना लाच दयावी लागेल असे खोटे कारण सांगुन फिर्यादीकडून रु. १७,८०,०००/- रक्कम रोखीने व बॅकिंग प्रणालीव्दारे स्विकारुन फिर्यादी यांची आर्थिक फसवणुक केली म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारी वरुन वालीव पोलीस ठाण येथे गु.र.क्र. ८८४/२०२३ कलम ३८४,३८५,३८८,३८९,४२०,४०६,४११,१२०(ब),३४ भा.दं.वि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदर गुन्हयाचे तपासादरम्यान तांत्रीक विश्लेषणाचे आधारे आरोपीची माहीती काढली असता आरोपी नामे नफीज शेख हा मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेवुन त्याचेकडे तपास केला असता गुन्हयातील इतर दोन आरोपी हे राजस्थान व गुजरात राज्यात वास्तव्यास असलेबाबत माहीती मिळाल्याने लागलीच गुन्हे प्रकटीकरण शाखेचे वेगवेगळे पथके तयार करुन राजस्थान व गुजरात राज्यात पाठवुन त्यांनी महिला आरोपी हिस श्रीगंगानगर, राजस्थान व पुरुष आरोपी यास सुरत, गुजरात येथुन ताब्यात घेवुन त्याचेकडे तपास केला असता त्यांनी अशा प्रकाराचे इतरही गुन्हे केल्याची कबुली दिली आहे. अटक आरोपी नामे १) नफीस हमीद शेख, वय २९ वर्षे, रा. मु.पो. वज्रेश्वरी, ता. भिवंडी, जि. ठाणे, २) मनिषभाई मनुभाई सेठ, वय ४८ वर्षे, रा. जि. सुरत, गुजरात व ३) महीला आरोपी नामे साहिबा

राजवीरसिंग बक्षी उर्फ नीतु जयप्रकाश पांडे, वय २९ वर्षे, रा. श्रीगंगानगर शहर, राजस्थान यांना अटक करण्यात आली आहे.

अटक आरोपी यांनी फिर्यादी यांना ब्लॅकमेल करुन मिळालेले रु. ७,८८,०००/- रक्कम जप्त करण्यात आली आहे. तसेच आरोपींनी गुन्हयात वापरलेली टोयोटा फॉरच्युनर व मारुती सुझुकी बलेनो कार जप्त करण्यात आली आहे. असा एकुण रु. २२,१०,०००/- किंमतीचा मुद्देमाल आरोपी यांचेकडुन जप्त केला आहे. आरोपी यांनी अशाच प्रकारचे आणखी गुन्हे केलेले असुन यांचे विरुध्द खालील प्रमाणे गुन्हे दाखल आहेत.

| **अ.क्र.** | **पोलीस ठाणे** | **गु.र.क्र. व कलम** |
|---|---|---|
| १ | वालीव | गु.र.क्र. ८८४/२०२३ कलम ३८४,३८५,३८८,३८९,४२०,४०६,४११, १२०(ब),३४ भा.दं.वि. |
| २ | वालीव | गु.र.क्र. ९१३/२०२३ कलम ३८४,३८५,३८८,३८९,१२०(ब),३४ भा.दं.वि. |

वरील कामगीरी श्रीमती पौर्णीमा चौघुले-श्रींगी, पोलीस उप आयुक्त, परीमंडळ- २ वसई, श्री. विनायक नरळे, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग, वालीव पोलीस ठाणे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. जयराज रणवरे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. जिलानी सय्यद यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटिकरण शाखेचे स.पो.नि. सचिन सानप, पो.हवा/ मुकेश पवार, मनोज मोरे, किरण म्हात्रे, सचिन दोरकर, सतीश गांगुर्डे, बाळु कुटे, पो.अं/ विनायक राऊत, अभिजीत गढरी यांनी यशस्वीरित्या कामगीरी पार पाडली आहे.

-----ooo-----